म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९९३०
१६३९

७८८९

क्र. ११९
डिसेंबर १९

कै. बी. जी. तहरकर यांचे स्मरणार्थ
संस्थेस भेट.
डिसेंबर १९८०

REFBK-0005907
REFBK-0005907

१९०७

# पारिजात

प्रकाशन

-५-

# -आजचीं गाणीं-

१

वीर सामंत —

१ ऑगस्ट १९३९.

REFBK-0005907
REFBK-0005907

सौ. स्नेहल सामंत बी. ए.
यांनीं 'पारिजात प्रकाशन 'साठीं
प्रसिद्ध केलें.

[ या पुस्तकांतील मजकुरांतून उतारा घेणें, भाषांतर करणें, ध्वनि-मुद्रितें, आकाशवाणी, बोलपट वगैरेसाठीं उपयोग करणें, इत्यादि सर्व हक्क कर्त्याकडे आहेत. ]

—मूल्य—
नऊ आणे.

मुद्रक—वा. ना. ठकार
श्रीसिद्धेश्वर प्रेस,
कोल्हापूर.

श्री. रघुवीर सामंत बी. ए. बी. टी.

यां चीं

# पु स्त कें

**प्रकाशित—**

१ हृदय (लघुकथा व शब्दचित्रें)

२ वाळूंतील पाउलें (लघुकथा)

३ सुरंगीची वेणी (रूपांतरित लघुकथा)

४ प्रवासांतील सोबती (कादंबरी)

५ अभ्र–पटल (कादंबरी)

६ आजचीं गाणीं–१ (कविता)

**छपाईस तयार—**

७ आकाश–गङ्गा (कादंबरी)

८ पणत्या (लघु-निबंध)

**कल्पित—**

९ तारांगण (चिमुकल्या चांदण्यांचा संग्रह)

१० तांडा (लघुकथा)

श्री. रघुवीर सामंत बी. ए. बी. टी.
यां चीं
## शालोपयोगी पुस्तकें

छपाईस तयार—

१ वानग्या (पूर्वार्ध)
(हायस्कूलसाठीं स्थूलवाचन)

२ वानग्या (उत्तरार्ध)
(हायस्कूलसाठीं स्थूलवाचन)

३ 'मी लेखक होणार!–'
(इंग्रजी १ ते ६ वर्गांसाठीं मराठी निबंध-मार्ग-दर्शिका)

पारिजात पुष्प—

'कथा–कलाप' व 'नंदा–दीप'
या पुस्तकांचे कर्ते
**प्रो. वाय्. जी. नाईक**
यांची
**'मृगजळावरील नौका'**
(कादंबरी)
विक्रीस तयार!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १८०८

स्थळ प्रत

**'खांडवी-काव्य' 'मुक्त-काव्य'**
**'गूढ-गुंजन' 'अर्पण'**
**इ० इ०**

( चुकून कोठें यमक साधतें !.. अर्थहि वेटा व्यक्त होतसे !
गद्य म्हणून हें ग्रहण करावें !– किंवा...कविता साधी सुंदर ! )

कोरा कागद !–काळी शाई !
–' साचे–वाङ्मय ' सवंग झालें !
शीण कोण डोक्याला देतो ? ?
–समाजास झोंपेचें औषध !
लिहिणारा तो मोठा लेखक !
शब्द जोडुनी कविता होते !
गळा गोड ! आळवी निरर्थक !
–सारे.. कवि–वर, रसज्ञ,. .लेखक ! !
दूर चंद्र–तारका चमकती !..
'प्रतिभा' !.. 'स्फूर्ती' !.. ' अभिजात कवी ' !
जगण्यांतुनि परि वाङ्मय होतें !
गद्य युगीं या गद्य बोलकें !
जिवन्त गद्या पद्य जो गणी !
रसिकवरा त्या अर्पित ' **गाणीं** '

मुंबई २४।१।३९.

# आजचीं गाणीं

१

रघुवीर सामंत

## म्हणतील मला मग–

## ‘ हा कविता करणारा ’

[राग–पहाडी.
ताल–एकताल.]

मी कवी न !–याही नच काव्याच्या खाणी !
आजच्या जगाचीं साधीं खडखड–गाणीं !
थरथरेल सारें अंतर आर्त रवांनीं !
गुदगुल्या न करतिल कोणा हीं रडगाणीं !

लाडीक गुजें ! अन् मुरली, राधा–राणी !
मी कशी करूं पण नाजुक सुंदर गाणीं ? ?–

वन दूर !-निसर्गी ठरवी खडखड हीन !
शहरांत मातला...मेला...मानव दीन !

शैथिल्य आज ये—हृदया..नेत्रा...गात्रा !
तोचतोपणाची झाली जीवन-यात्रा !
बेसूर जगीं नच आतां वीणा-गीतें !
गोंधळी जगाला हवींत सांघिक-गीतें !

* * * *

गद्यांत पटेना !—जुळवित मी गणमात्रा !
-म्हणतील मला मग-'हा कविता करणारा !'

मुंबई,
१ जानेवारी, १९३९.

ग्रंथालय ठाणे
दा. क्र.
शाखा

# २

# एक बुडबुडा !--पण चेतविन चुडा !

१ गळ खेळे काळ गळां !

२ एक बुडबुडा !--चाललों सडा !-

३ गरर् फिरत भोंवरा !-

४ चेतवी चुडा !-

५ क्षुद्र बुडबुडा !- पण चेतविन चुडा-!

७८८९ क्रमांक १९२१९८०

# एक बुडबुडा !-पण चेतविना चुरा !

## [ आशा–निराशेचें गाणें ]

राग–मिश्र मांड
ताल–दादरा

[ आशा आणि निराशा दोन्ही बाजूनीं भंडावूं लागल्या कीं असा एकच एक अर्थहीन गोंधळ होतो !— ]

—१—

गळ खेळे काळ गळां !–लागती कळा !
रक्त घळघळा !
मृत्युची कळा !
लागला गळा !—
ही सळसळ जणुं पळत जीव–मासळी तळा !

पळ डळमळ ! जळ-जीव वेगळा !
जळ दूर जाय !–रक्त घळघळा !
लव तगमग ! मग मृत्युची कळा !
गळ खेळे काळ गळां ! लागल्या कळा !
रक्त घळघळा !
मृत्युची कळा !
लागलों गळा !—

—२—

कालौघ खोल !.. त्यांत फोल एक बुडबुडा !
क्षणिक बापुडा !
चालला सडा !
शोधतो कडा !
मी वेडाऽ !–मी वेडाऽ !–बुडबुडा !–
क्षुद्र बुडबुडा !
क्षणिक बापुडा !
चाललों सडा !—

खळ खळ जळ ! काळ–नदा पार ना कडा !
होऽऽ ! केवळ मी त्यांत बुडबुडा !
वरि रंग विविध !—आंत कोरडा !
मी ऽ ऽ धडपडतों—शोधतों कडा !
मी वेडाऽ !–मी वेडाऽ ! बुडबुडा !—
क्षणिक बापुडा !
चाललों सडा !
शोधतों कडा !—

—३—

मी दंग !—
करि ढंग !—
किति रंग !—
गरगर परि फिरत भोंवरा !
हा स्वार पुढें मृत्यु हावरा !
धर धीर,.. जीव जंव न बावरा !
भोंवराऽऽ !

गर्र्र् फिरत भोंवरा !

परि अंतरिं शांत स्रवे स्फूर्तिचा झरा !

मम हृदयाच्या स्फूर्तिचा झरा !

धैर्य–सागरा !—

ऊठ !–कर त्वरा !

फिरत भोंवरा !—

—४—

भय फार !—

अंधार !—

अनिवार !—

तुज भव दावी मृत्युचा कडा !

परि धीर धरी लढविण्या लढा !

अन् चेतव चैतन्य–मय चुडा !

चेतवी चुडा !

चैतन्याची चेतवी चुडा !

शीर ना धडा !
लढत हा लढा !
पेटवी चुडा !

—५—

कालौघ खोल—त्यांत फोल एक बुडबुडा !
मी वेडाऽ !—मी वेडाऽ !—बुडबुडा !
क्षुद्र बुडबुडा !
क्षणिक बापुडा !
चाललों सडा !
जोंवरी परि जग जगतें चेतविन चुडा !—
चैतन्याची चेतविन चुडा !
चेतविन चुडा !..क्षूद्र बुडबुडा !—पण चेतविन चुडा !

मुंबई,
१५ ऑगष्ट १९३८

# ३

# मानवतेच्या यज्ञांत घरघर !

१ घाईऽगडबड !
२ हुरहुर !-हळहळ !-
३ घरीं न भाकर !
४ स्वर्ग न सृष्टी !

सं. ........ नं. ........
ता. ........

# मानवतेच्या घशांत घरघर !---

## [ यांत्रिक युगाचें गाणें ]

राग–जोगिया
ताल–केरवा.

[ **भूमिका**—यंत्रांचा प्रचंड खडखडाट !–फ्लायव्हीलमधून निघणारा 'सूंऽऽ' आवाज हळूंहळूं द्रुत गतीनें मोठा होत जातो. मागील तालबद्ध खडखडाट तसाच पार्श्वभूमीला राहतो; शेवटीं चक्रांतून निघणाऱ्या हुंकाराचा ध्वनि मोठा होत होत मागील यंत्राच्या तालावर गाणें हवेंत तरंगूं लागतें– ]

[ काल–भोंवरा फिरतो गरगर !—
मानवतेच्या घशांत घरघर ! ]

\+ + + +

—१—

घाईऽ !– घाईऽ !– घाईऽ गडबड !
ठायीं ठायीं घाईऽ गडबड !—

काव्य कुठें ?– ही यांत्रिक खडखड !
स्फूर्ती मेली !– शाब्दिक बडबड !
जीव जगे—जंव करितो तडफड !
सारी पोटासाठीं धडपड !–
शांती नाहीं !– खडबड गडबड !
यांत्रिक युग हें ! . . भवतीं खडखड !
भावना नुरे !– वेडी बडबड !
जीवन जाळी यांत्रिक धडधड !
जीव–पाखरूं फिरतें फडफड !
पंख पोळती !– करतें तडफड !

× × ×

क्षण न जगाया !– जगण्या धडपड !
यांत्रिक खडबड ! . . दांभिक बडबड !

—२—

इमले चढले गगनीं पोकळ !
जगांत जीवन नुरलें निर्मळ !

कोठें आतां जीवन सोज्वळ!
काळ पळाला!– भोळा निर्मळ!
दरी–कपारी! काळे कातळ!
गिरी मिरविती हिरवें वाकळ!
हिरवी पाचू!–ती वर हिरवळ!
स्वैर भरारे वारा सळसळ!
झरझर निर्झर वळती वळवळ!
तिथें गांवठा साधा सोज्वळ!
सान रानवट घरकुल–राउळ!
कोसळतें परि बनांत वारुळ!

× + ×

जगिं ना आतां जीवन निर्मळ!
सारी उरली हुरहुर हळहळ!

—३—

नभांत वाणी भरली भेसुर!—
"देव जगाचा शास्त्रानें नर!"

जग कापवितीं यंत्रें थरथर !
निसर्गास नर करतो किंकर !
पुढें पुढें जग सरलें सरसर !
चमत्कार शास्त्रांचा भू-वर !
शास्त्रें बनला मानव खे-चर !
अधःस्थळीं पण काळा फत्तर !
गरुड-भरारी मारी वानर !
नवीं मृगजळें क्षणिं दृग्गोचर !
उद्धत मानव आतां ताठर !
कृत्रिम दांभिक झाला बेडर !

\+ + +

दारीं पेरी वरवर साखर !
जगावया परि घरीं न भाकर !

—४—

सुखें जगाया शास्त्रें भू-वर !
मानव निर्मी यांत्रिक-हुन्नर !

यंत्र परी करितें यांत्रिक नर !
चाकरा–करें झाला चाकर !
देवच मानव झाला भू–वर !
भस्मासुर करि देवा पामर !
भावना सरे !–सुकला पाझर !
हृदय फाटलें !–उठलें काहुर !
स्वर्ग न सृष्टी !–ना त्याला घर !
डळमळतें तळमळतें अंतर !
जीवन निर्मळ साधें सुंदर –!
दुर्मिळ करिती शास्त्रें–हुन्नर !

* * *

प्राण–वायुसम विष–वायूवर !–
जगतो मरतो या जगतीं नर !–

* * *

[ काल भोंवरा फिरतो गरगर !—
भानवतेच्या घशांत घरघर !– ]

मुंबई,
२४।१२।३८

दा. क. १२०८
४
स्थळ प्र
सं. ......... नं.
ता. .........
ठाणें.

# हुश्शार !

१ रात्र संपली !
२ हुश्शार ! भाइ, हुश्शार !
३ जगावया मरणार !
४ कोसळलेला तो वाडा !
५ दंभाचा उडवा धुव्वा !
६ सध्यां अर्धी भाकर प्यार !
७ बघ जग दारूचें कोठार !
८ शास्त्र निर्मितें घोर कडे !
९ हा विरेल नंतर धूर महा !

# हुश्शार !

## [ आजचें गाणें ]

| -राग- | -ताल- |
| --- | --- |
| दुर्गा व भूप; | केरवा ( पडघमचा) |

[ भूमिका—जुटीच्या पलटणीचें हें एक सांघिक गीत आहे. मुख्य गाणें म्होरक्या म्हणतो. त्याच्या मागें जमून शिस्तींत चालत, सारे शांति-सैनिक एक दिलानें ‘ हुश्शार !–भाइ, हुश्शार !’ या शब्दांनीं त्याला साथ देत आहेत.—]

—१—

[ राग–दुर्गा; ताल–पडघमचा केरवा ]

[ ‘ हुश्शार ! ’ या संदेशाचे, बिगूलचे सांकेतिक ध्वनी

लांबून हवेंत उठत आहेत. हळूं हळूं ते स्वर मोठे होत जवळ जवळ येतात. त्याबरोबरच हातांत पांढरें शांति-निशाण घेऊन म्होरक्या पुढे येतो. बिगूलाच्या स्वरांचे व पडघम वगैरे रणवाद्यांचे तालबद्ध पार्श्वसंगीत घेऊन, म्होरक्या प्रथम एकटाच शांततेंत हळूंहळूं स्पष्ट होत जाणाऱ्या आवाजानें म्हणूं लागतो ]

[ म्होरक्या— ]

राञ संपली !.. प्रभा फांकली !.. पूर्व उजळली !—
भाइ, हुश्शार !
हा पूर्वेकडला वात नवा ! कर डोळस डोळे !—
हो हुश्शार !
भाइ, बंडी चढवित वेळ न टाळा !—
काळा व्हा तय्यार !
हं, चला पुढें ! करूं छाती उघडी !—
पुन्हां न घडि येणार !
हुश्शार ! भाइ, हुश्शार !
हुश्शार ! भाइ, हुश्शार !

[ बिगुलाचा आवाज व म्होरक्याचे हळूहळू मोठे होणारे शब्द यांनीं सावध होऊन, निरनिराळ्या बाजूंनीं जूटींचे शांतिसैनिक जवळ येऊं लागतात— ]

[ म्होरक्या पुन्हां मोठ्यानें ]—

हुश्शार !– भाइ, हुश्शार !–
हुश्शार !– भाइ, हुश्शार !–

[ एका बाजूनें आलेले सैनिक सारे एकदम म्हणतात. ]

**आम्ही नव्या मनूचे स्वार !–**
**आतां सावध घटका चार !**

[ दुसऱ्या बाजूनें आलेले सैनिक सारे एकदम म्हणतात— ]

**हो, सावध घटका चार !**
**आतां साऱ्यांना हाकार !**

[ दोन्ही बाजूचे सैनिक म्होरक्याला एकदम म्हणतात— ]

**हं, भाइ, साऱ्यांना हाकार !—**
**तूं साऱ्यांना हाकार !–**

[ म्होरक्या मोठ्यानें— ]

हुश्शार व्हा !— हुश्शार व्हा !— हुश्शार !
भाइ, तुम्हि हुश्शार !

[ सारे सैनिक एकदम— ]

हुश्शार ! भाइ, हुश्शार !
हुश्शार ! भाइ, हुश्शार !

[ सगळे, म्होरक्यामागून चालूं लागतात. कांहीं वेळ, पडघम, पावलें यांचाच नुसता आवाज— ]

—३—

[ म्होरक्या चालतां चालतां ]

नव्या मनूचे स्वार ! आम्ही उगा न कधिं मरणार !
धीर आम्ही हो वीर फांकडे ! जगावया मरणार !
हुश्शार ! भाइ, हुश्शार !
सावध घटका चार ! आतां भाइ सावध घटका चार !
मरूं जगाया यार !—नंतर जगणें हाच विचार !

हुश्शार ! भाइ, हुश्शार !

हुश्शार !– भाइ, हुश्शार !– हुश्शार ! भाइ हुश्शार !

हं, भाइ, साऱ्यांना हाकार !

भाइ, तूं साऱ्यांना हाकार !

हुश्शार व्हा !– हुश्शार व्हा !– हुश्शार !–

भाइ, तुम्हि हुश्शार !

हुश्शार !–भाइ, हुश्शार !

हुश्शार !– भाइ, हुश्शार !

[ कांहीं वेळ नुसता पावलें व पडघम यांचा जोरकस आवाज. ]

—४—

[ थोडें अंतर काटल्यावर, म्होरक्या पुन्हां—]

कां बडबडता वेदान्त बडा ?–

अन् पूर्व–बढाईचा पाढा ?

छेः !–कोसळलेला तो वाडा !–

तो पोकळ माळा दिसे बडा !

हुश्शार !–भाइ, हुश्शार !

कां चेंगरता ?–तो डोलारा !–
त्या जुन्या विटा खालीं ओढा !
वर धूळ सांचली ती झाडा !–
अन् हव्या तिथें त्याही फोडा !
हुश्शार ?–भाइ, हुश्शार !
मग नव्या जुन्यावर जा जोडा !–
भाइ, करा मनाचा अतां धडा !
हुश्शार !–भाइ, हुश्शार !
बांधा बांधा, नवाच वाडा !–
तुम्हा–अम्हाला प्यार !–
भाइ हो, तुम्हा–अम्हाला प्यार !
हुश्शार !–भाइ, हुश्शार !
भाइ, नवाच वाडा प्यार !–
आजचा जुनाट झाला फार !–
जगूं जगूं !–मग तगमग नलगे !..
दिवस सुखाचे चार !

हुश्शार !–भाइ, हुश्शार !

नव्या मनूचे स्वार !–

अतां ह्या सावध घटका चार !

व्हा मरावया तय्यार !–

भाइ व्हा मरावया तय्यार !

हुश्शार ! भाइ, हुश्शार !–

आतां मरावया तय्यार !

[ पुन्हा कांहीं वेळ पडघम व पावलें यांचाच नुसता आवाज ]

---

—५—

[ आणखीं पुढें चालत गेल्यावर म्होरक्या पुन्हां— ]

या साऱ्यांना निज–स्वार्थ हवा !–

मग रक्ताचा हेवा–दावा !

बघ, ओठिं शांततेचा बकवा !–

पण पोटिं हीनतेचा कावा !

हुश्शार !–भाइ, हुश्शार !

स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणें.

अन् भावाचा तुकडाच हवा !-
मग ओळख ना भावा-भावा !
भाइ, जग फिरलें !-आतां धांवा !-
हें बंधु-शिरीं करिती घावा !

हुश्शार !-भाइ, हुश्शार !

पण दंभाचा उडवा धुव्वा !-
जरि शांति-दूत हृदयांत महा !
हो, दंभाचा उडवा धुव्वा !-
अन् खऱ्या शांतिला फूल वहा !

हुश्शार !- भाइ हुश्शार !

नव्या मनूचे स्वार !-आम्हां उगा न मरणें प्यार !
मरूं जगाया यार !-नंतर जगणें हाच विचार !

हुश्शार ! भाइ हुश्शार !
आम्हां जगणें हाच विचार !

[ कांहीं वेळ पडघम व पावलें यांचाच फक्त आवाज. ]

—६—

[ म्होरक्या पुन्हां पुढें जातां आतां मोठयानें– ]

नव्या मनूचे स्वार !– आतां मरूं जगाया यार !
डोळिं–भाळिंचीं काळीं वलयें विलया नेऊं पार !

हुश्शार !– भाइ, हुश्शार !

हा जीव कोंडला फार !– आम्हां देव न धन आधार !
वर नसो तुपाची धार ! सध्यां अर्धी भाकर प्यार !

हुश्शार !– भाइ, हुश्शार !

हा स्वार्थ माजला फार !—सारी सृष्टी थरथरणार !
बघ बंधु–भावना ठार !–चाले मानवि·पशु संचार !

हुश्शार !– भाइ, हुश्शार !

सावध व्हा !– भाइ, नभीं पहा !– नभीं पहा !

नभीं पहा !– भाइ, नभीं पहा !

ते विमान घरघरतें !.. पक्ष्यांची किलबिल होई फार

नभीं पहा !– भाइ, नभीं पहा !

हा विष-वायूंचा धूर कोंदला !— उभें मृत्यूचें दार !

नभीं पहा !— भाइ, पुढति पहा !

हा शांति—दूत हृदयांत महा !— पण देह होंत बेजार !

जर युद्ध शांतिचें दार !—करूं तर कडी—गजांवर वार !

हुश्शार !— भाइ, हुश्शार !

नव्या मनूचे स्वार !— अतां व्हा, सावध घटका चार !

जगणें हाच विचार !— व्हा भाइ, मरावया तयार !

हुश्शार !— भाइ, हुश्शार !—

हं, तूं साऱ्यांना हाकार !

हुश्शार व्हा !— हुश्शार व्हा !— हुश्शार !

भाइ, तुम्हि हुश्शार !

हुश्शार !— भाइ, हुश्शार !—

आम्हि मरावया तय्यार !

[ पुन्हां कांहीं वेळ पडघम व पावलें यांच्याच नुसत्या आवाजावर पलटण पुढील वाटचाल करीत जाते— ]

—७—

[ कांहीं वेळानें म्होरक्या— ]

नव्या मनूचे स्वार !–आल्या सावध घटका चार !
आम्हि मरावया तय्यार !--मनीं जरि जगणें हाच विचार !

हुश्शार !– भाइ, हुश्शार !

जरि रविकर आम्हां प्यार ! पण हा क्षणभर अंधःकार !
हो, हवा गान–झंकार !– या पण तोफा धडधडणार !

हुश्शार !– भाइ, हुश्शार !

भाव—भावना ठार !– हें तर उभें मृत्युचें दार !

हुश्शार !– भाइ, हुश्शार !

हं ! हुश्शार आतां यार !–धडकलें पहा मृत्यूचें दार !

हुश्शार ! भाइ, हुश्शार !

हं, सावध व्हा ! भाइ, सावध व्हा !

हं, भाइ, सावध व्हा ! सावध व्हा !

बघ जग दारूचें कोठार ! त्यावर ठिणग्या चकमकणार !–

सावध व्हा ! भाइ, सावध व्हा !

हा दीनांचा संहार!–उडाला एकच हाःहाःकार!

**सावध व्हा! भाइ, सावध व्हा!**

बघ बंधु–शिरावर वार! घळघळे रक्त!–दुःख अनिवार!

**सावध व्हा! भाइ, भंवति पहा!**

हीं मढीं!–गिधाडें!–घार!–अतां चौफेर हेंच दिसणार!

**भंवति पहा! भाइ, भवतिं पहा!**

पण नव्या मनूचे स्वार!–अतां व्हा मरावया तय्यार!
हो, जगणें हाच विचार!–अतां परि मरूं जगाया यार?
**भाइ, तूं साऱ्यांना हाकार! हं, साऱ्यांना हाकार!**
हुश्शार व्हा!–हुश्शार व्हा!–हुश्शार!

भाइ, तुम्ही हुश्शार!–

**हुश्शार! भाइ, हुश्शार!–हा एकच हाःहाःकार!**

[ घरादारांच्या रणभूमीवर पलटण फिरत आहे. पडघम पावलांचा आवाज. लांबवर सैन्याचा व शस्त्रास्त्रांचा गोंधळ चालला आहे—]

[ म्होरक्या कंठरवानें खड्या आवाजांत—]

हे देइ वृद्ध अनुभवी धडे !—तो शब्द बोबडे बाळ रडे !

हुश्शार !-- भाइ, हुश्शार !

परि सैन्य नवें चाललें पुढें !—छे:,नको अम्हां पण युद्ध झडे !

हुश्शार !- भाइ, हुश्शार !

बघ शास्त्र नेइ जग पुढें पुढें !

परि तेंच निर्मितें घोर कडे !

हुश्शार !—हुश्शार !

हे स्फोट फोडिती घरें-कडे !

हुश्शार !—हुश्शार !

बघ कवाडापुढें सैन्य खडे !

हुश्शार !—हुश्शार !

नभ-स्फोट फोडती घरें-कडे ! अन् कवाडापुढें सैन्य खडे !

हुश्शार !- भाइ हुश्शार !

सावध व्हा !-- भाइ, नभीं पहा !--भाइ, पुढतिं पहा !

हं, सावध व्हा !-- सावध व्हा !-- नभीं पहा !

पुढति पहा !

हं, हुश्शार ! हुश्शाऽऽर ! हुऽऽश्शाऽऽर !

[युद्ध... बॉम्ब ... विमानांची घरघर... मशीनगन्स... संहार... हाःहाःकार...दीन किंकाळ्या....मृत्यु....शेवटीं स्मशान–शांतता... ]

—९—

[ राग–भूप ]

[ स्मशान शांततेंतून सळसळ ! म्होरक्यासह सारी पलटण जमीनीवर छिन्नविछिन्न स्थितींत पडलीं आहे. त्यांतून हळूंहळूं त्यांची भुतें उठून वरवर जातात. म्होरक्या वरवर जात बरुन गंभीर शब्दांत पुढें म्हणत आहे.–]

विरेऽऽल नंऽतर धूऽऽर म्हा !–
तोऽऽ काऽळ नवाऽ ! मग साऽवध व्हा !–

[ पडघमच्या तालांत–
म्होरक्या खालीं पहात– ]

हा विरेल नंतर धूर महा ! तो काळ नवा मग सावध व्हा !

हुश्शार ! भाइ, हुश्शार !

घ्या ! दीर्घ श्वास घ्या ! नवी हवा !—

तीं प्रफुल्लवदनें भवतिं पहा !

हुश्शार ! भाइ, हुश्शार !

गंभीर शांतता जगीं महा ! चौफेर शांतता दिसे अहा !

हुश्शार ! भाइ हुश्शार !

जा ! नव्या जगीं त्या सुखें रहा !

तीं प्रफुल्ल वदनें भवति पहा !

हुश्शार ! भाइ, हुश्शार !

नव्या मनूचे स्वार ! तुम्हां जगणें हाच विचार !

नव्या जगीं जगणार ! ..

तुम्ही नव्या जगीं जगणार !

सुखांत नांदा यार ! तुम्ही मग सुखांत नांदा यार !

हुश्शार ! भाइ, हुश्शार !

भाइ त्या साऱ्यांना हाकार !

हुश्शार व्हा ! हुश्शार ! भाइ, हुश्शार व्हा ! हुश्शार !
मरत तुम्हास्तव यार ! अतां जा–जगा जगा हुश्शार
हुश्शार ! भाइ, हुश्शार !

हुश्शार ! भाइ, हुश्शार !

[आवाज अस्पष्ट अस्पष्ट होत, ती सारी पलटण हवेंत विरते.]

५

# सान केन्द्र कल्पिती !

## सुखाप्रती हपापती !–

१ जीवनौघ चालला !
२ मन्द वायु वाहतो !
३ कालचक्र कलटलें !
४ यमपुरी न कल्पना !
५ जीव एकटा फिरे !
६ सान केन्द्र कल्पिती !

# सान्त केन्द्र कलिपती !
# सुखाग्रती हपापती !-

## [ जीवित ]

राग–भैरवी
चाल–दादरा

कोण ये कुठून ? हें कुणी कधीं न जाणती !
‘ जीवनौघ जन्म घे कुठून ? ’–गूढ जीवितीं !
उंच उंच डोंगरांत . . गूढ गूढशा दरींत !
येथ हा पहा प्रवाह हिर्वळींत खळखळे !
चालला कुठें ? कुठून ?– जात तो पुढें पुढें !
काटकीपरी परी जीव मात्र धडपडे !
एक ये इथून–ती दुजी तिथून काटकी !

—प्रेमभेट ! . . अल्पवास ! . . हेंहि त्यांस सार्थकीं !
जीवनौघ चालला ! . . फेंस खळखळे उडे !

एकटें तरावयास जीव आंत धडधडे !
ओघ हा खळाळणार ! . . सर्व नाश पावणार !
हृदय—सागरीं परी न लाट काय हो उठे ?

*　　　　*　　　　*

सान केंद्र कल्पिती ! . . सुखाप्रती ह्पापती !
—एकटेपणा कुणा असह्य हो न जीवितीं ? ?

—

—२—

मंद वायु वाहतो !..माड उंच डोलतो !
वृक्ष–वृंद सळसळून खग–गणास बाहतो !
चांद चालला फिका !..मंद होत चांदण्या !
धेनुवत्स हंबरून ओढतात दावण्या !
उजळती दिशा !.. अतां गगन होत तांबडें !
थांबथांबुनी मधून साथ देत कोंबडे !..
भाकरी चुलीवरी !.. धूर कांपरा उडे !
झोंपडींत झोंपले  सान बाल बापुडे !..
गोठियांत वासरें !.. दूर सोडिले गुरां !
'सांज भेटवील !' त्यांस आस ही असे उरां !
पोट दोन वेळचें !..बायको–मुलें घरां !
वाट दूर जाय कांटुनी मजूर भरभरां !

–बांधुनी शिदोरि ती घरधन्यापुढें करी !
चेहरा किती खुले !..नि हात घेत भाकरीं !



स्थळ प्रत
सं. ........ सं. ....
ता. ........

या क्षणीं तरी सुखी!..ये न ये जगीं सुगी !
सांगणें कशा उगीच?...'शाश्वती न या जगीं !'
कोण ये कुठून ? हें कुणी जरीहि नेणती–
..एकटेपणा कुणा असह्य हो न जीवितीं !!

—३—

कालचक्र कलटलें !.. ललाट—लेख हो खरा !
लाज लक्तरांत !— भीक मागतें घरां घरां !—
या इथें न लाभल्यास जात तेथ सत्वरीं ;
ना मनास आस !—यत्न चालला सदा परी !
बाळ सान गोडसें,.. रम्य ज्यास बाळसें,..
गुरफटून चिरगुटांत पाठ राखण्या बसे !
साउलींत शांतशा श्रांत बैसली जरा !
चुंबि प्रेमयुक्त हांसऱ्या तिच्याच लेंकरा !
लाळ सांडते !.. धुळीस बाळ देइ मौक्तिकें !
आस लावण्या पुढेंच भावि—काळचें धुकें !
फूल मूल पाहुनि पिसें कुणास ना जडे ?
तोषवाच हांसुनी जरा तिच्या मुलाकडे !—

हृदय—कांठ सांडले !.. हांसली पहा कशी !
बाल—हास्य !..त्यांत आस तीस सांपडे पिशी !

—या क्षणीं तरी सुखी ! . . जीवनांत धुगधुगी !
सांगणें कशा उगीच ?... ' शाश्वती न या जगीं ! '
कोण ये कुठून ? हें कुणी जरीहि नेणती !
एकटेपणा कुणा असह्य हो न जीवितीं ? ?

—४—

यम–पुरी न कल्पना !.. गिरणगांवला चला !
चक्र क्रूर !.. पोट–शूळ !.. जीव तेथ भाजला !
धूर ओकुनी नभीं, यंत्र–काम घडघडे !
मानवीय मालिकेस पोट चारितें खडे !
हीन दीन बापुडे !.. ओढतात जोंखडें !..
..जीव झांपडे, रडे !.. जळत आंत आंतडें !–
धांप टाकटाकुनीच श्रमित कंठ कोरडे !
लक्ष्मि हो तरी पुढें !.. झुके तिचेंच पारडें !
मानवी पशूंमुळेंच दैव दावितें कडे !
निर्मिलीं नरेंच, मेंढरी जगांत गारुडें !
पुण्य मोजल्यामुळें भरत पातकी घडा !
अंध सोंवळें बळी !.. तत्ववाद वांकडा !

आज गिरणगांवला खड्खडाट थांबला !–
‘ मृत्यु सर्व नाशणार !..’ त्या कथा न आजला !

काळ खेळतोच खेळ !— वेळ ना जगायला !
पोट जाळण्यामधेंच मर्द आज गांजला !
कोण ये कुठून ? हें कुणी कधीं न जाणती ! . .
—एकटेपणा कुणा असह्य हो न जीवितीं ? ?

—५—

जीव एकटा फिरे ! सागरीं न आसरा !
‘ दीस जायचा अजून तीन चार कासरा !
डोइ भाजली ! नभांत सूर्यदेव तापले ! ’
दूरदूर राहिली .. घरकुली, प्रिया—मुलें !
उंच नीच नाचती !.. वीचि फेस टाकती !
गरगरा फिरून आंत खेंचण्यास धांवती !
ओढि रांपणी भरून !.. भीत ना मुळीं उरीं !
—आणि चालली तशीच जीव—नौ तयांवरी !
सांज काळवंडली !.. पक्षि जात कोटरा !
नाव लाउनी तिरा हसत धांवला घरा !
मंद ज्योत मिणमिणे !... खात शांत भाकर !
झोंपडींत झोंपला !.... नि दूरदूर सागर !

ॐ ॐ ॐ ॐ

कां अतांच सांगणें तयास,.. ‘ सर्व नश्वर ! ’ ?
जीवनांत शांतता !... नि दूरदूर सागर !

या क्षणीं तरी सुखी ! . . जीवनांत धुग्धुगी !
भागल्या जिवास हीच स्वर्ग देत वानगी !
सान केन्द्र कालिपती ! सुखाप्रती हपापतीं !
—एकटेपणा कुणा असह्य हो न जीवितीं ? ?

येथ तेथ चहुकडे . . विषमताच नांदते !
दलित दीन मानवास हें जिणेंहि बोंचतें !
भोंवतालच्या स्थितीस नेत्र झांकती कसे ?
जांचणी सदा जिवास लावितें न कां पिसें ?
. .उंचशा घरींहि यास झोंप ना मुळीं पडे !
—कांहिं ना म्हणून हा दुजा धुळीमध्यें रडे !
जन्म घे अशी स्थिती कां म्हणून 'नश्वरीं' ?
मानवीं मनेंच कां न दूषणीय चांवरीं ?
गोंधळी जगीं क्वचित् सुखी क्षणीं सुशांतता !
तेथ जाउनी तयांस शब्द काय सांगता ?
—अंत्य श्रेष्ठ जें, तयाप्रती खुशाल जा पुढें !
शब्द तेवढेच काय आणतां पुढेपुढे ? ?

*　　　*　　　*

सान केन्द्र कल्पिती ! सुखाप्रती हपापती !
एकटेपणा कुणा असह्य हो न जीवितीं ?



सं. ग्रं. ठाणें स्थळ प्रत
सं. क्र. ११०
ता. १७४९
ठाणें.
ग्रंथालय ठाणे
शा. क्र. ५८०८
ग्रंथ शाळा (स्थळ प्रत)

–गूढ 'कोण ? कोठुनी ?'–कुणी कधीं न जाणती !
एकटेपणा कुणास सह्य होत जीवितीं ??

ठाणें { नोव्हेंबर १९३४
डिसेंबर १९३८ }

# ६

# इमारती मर्दांच्या हातीं !

१ खेऽच्या र बिगी बिगारी !
२ बाजारी बिनमोल बिगारी !
३ जगायची मर्दाला चोरी !
४ वानी बोले ‘ उद्या उदारी ! ’
५ मेलि र् मेलि माजी इयेति !
६ भाकर बुड्ली या घामांत !
७ मर्दाच्या हातांत नरोटी !
८ इमारती मर्दाच्या हातीं !
९ हा धोंडा-राजा त्या रानांत !
१० धड् धडधड दारु ! करते घात !
११ गुलाम आला या शेहेरांत !
१२ पर ज्वोर बगा ह्यो या दंडांत !
१३ भाउ, धनीपना पुरातिच शिरमंति !
१४ हं !-थोडं न्हायलं दीस जगांत !
१५ या दगडी भिंतिबि गानं गाती !

# इमारती मर्दांच्या हातीं !

## [ बिगाऱ्यां . गाणें ]

राग—मिश्र बिलावल
ताल—केरवा

[ **भूमिका**—मुंबईतील एक सात मजली इमारत जवळ जवळ बांधून संपत आली आहे. शिखरावर बसवावयाचा एक मोठा अजस्त्र दगड वर चढविण्याचें काम आतां चालू आहे. पुलीवरील जाड दोरखंड ' कुर्कुर् ' करत खालीं येतो. त्याला तो दगड नीट बांधला जातो. आणि मग सारे बिगारी एकवट्टून पुलीवरून आलेलें दोरखंडाचें दुसरें टोंक ओढूं लागतात.

म्होरक्या वर उभा राहून दोन दोन ओळी ललकारून मोठ्यानें म्हणतो. त्याच्या मागें सारे बिगारी ' **खेच्चा र०** ' असें म्हणून हिसक्यानें ओढतात. असें अगदीं सातव्या मजल्यापर्यंत चालतें.]

—१—

हं खेऽऽच्चाऽर बिगी ! बिगारी !
खेऽच्चाऽर बिगी बिगी !
[ खेऽच्चा० ]
आरऽ ! करा करा बेळ्यांनीं छाती !
इमारती मर्दांच्या हातीं !
[ खेऽच्चा० ]
या दगडी भिंति र गानं गाती !
' इमारती मर्दांच्या हातीं ! '
[ खेऽच्चा० ]
हं ! खेऽऽच्चाऽर बिगी ! बिगारी !
खेऽच्चा र बिगी बिगी !
[ खेऽच्चा० ]

भाउ, कम्–नशिबाची आली र फ्येरी !
जगायची बी झाली चोरी !
[ खेऽच्या० ]
ह्यी छातीवर रुलतात लक्तरीं !
झालिर धोंड्याचीच पथारी !
[ खेऽच्या० ]
आन् सुकी, कोरडी, शिळी शिदोरी !
दुनियेमंदि र चालच् न्यारी !
[ खेऽच्या० ]
आर बली चालवी ह्यी शिरजोरी !
बाजारी बिनमोल बिगारी !
[ खेऽच्या० ]
पर खेऽऽच्या र् बिगी बिगारी !
खेऽऽच्या र् बिगी बिगी !
[ खेऽच्या० ]

—१—

ह्यो मुलकाचा न्हाय् गडी भिकारी !

पोटासाठीं र् येंच्या दारी !

[ खेऽच्चा० ]

आन् पदरीं पॉरं ! गरजु बिगारी !

आला र् आला येंच्या दारी !

[ खेऽच्चा० ]

या शिरमंतांची फुगलि र् ढेरी !

पैशापायी लय अंधेरी !

[ खेऽच्चा० ]

भाउ, काम करुन् बी ये अंधेरी !

जगायूची मर्दाला चोरी !

[ खेऽच्चा० ]

आर दुनियेमंदी चालच न्यारी !

मर्द रोजच्या रोज भिकारी !

[ खेऽच्चा० ]

आन् आला पोटापायीं दारीं !
खेऽऽचाऽर बिगी बिगारी !
[ खेऽचा० ]

—४—

तुमि पोटापायीं र् येंच्या दारीं !
खेऽऽचाऽर बिगी ! बिगारी !
[ खेऽचा० ]
ह्यी हातीं येतीं कुदळी–खोरी !
खडी मातिचा र् खुराक चारी !
[ खेऽचा० ]
आन् छपरावर चडतांना घेरी !
आस्मानी–पाताली फेरी !
[ खेऽचा० ]
पग् पैशापायी लय् अंधेरी !
काम् करुन् बी ये अंधेरी !
[ खेऽचा० ]

पर दिसा दो दिशीं एक रुपेरी !
वानी बोले र् ' उद्या उदारी ! '
[ खेऽच्या० ]
भाउ, जगायची मजुराला चोरी !
खेऽऽच्याऽर बिगी ! बिगारी !
[ खेऽच्या० ]

—५—

आर कोन् कुनाचा न्हाइ सांगाती !
पैसा बोलर् समद्या बाती !
[ खेऽच्या० ]
आन् गरिबाची न्हाइ नाती–गोती !
शिरमंतीचच् धक्कऽ द्येती !
[ खेऽच्या० ]
बग् बामन करतो घरांत मोती !
श्येतकऱ्याच्या तोंडी माती !
[ खेऽच्या० ]

शेट्-सावकराच्या घरयात श्येती !
कर्जापायीं र् झोली हातीं !
[ खेऽच्चा० ]
मंग् मागारिन् रडगानं गाती–
' पोरं बासी भाकर खाती !..'
[ खेऽच्चा० ]
भाउ, मुलकी माजी श्येती व्हती !
म्येलिर् म्येली माजी श्येती !
[ खेऽच्चा० ]
पर् करा करा मर्दानों छाती !
खे ऽ ऽ च्याऽर बिगी बिगी !
[ खेऽच्चा० ]

—६--

ह्यो आला बग उरफाटा वख्त !
पुरी पुरी भरली कम्बक्त !
[ खेऽच्चा० ]

सं. ........ नं. ....
ता. ............
ठाणें.

आन् नागर फिरला पुरा घरांत !
गाडवावरती निगे वरात !

[ खेऽच्चा० ]

मंग् येडा जुन् फिरतो भरमात !
डोम्ब प्येटला नसानसांत !

[ खेऽच्चा० ]

पर पॉटाची खल्गी कर घात !
आलों आलों र् गोत खात !

[ खेऽच्चा० ]

ह्ये पॉट बिगाऱ्याचं हातांत !
भाकर बुडलिर् ह्या घामांत !

[ खेऽच्चा० ]

पर ज्वोर बगा ह्यो या दंडांत !
घोंडा चडला र् अस्मानांत !

[ खेऽच्चा० ]

—७—

ह्ये पॉट आमूचं आमच्या पाठी !
अन् त्येंचा पैसा त्येंच्या गांठी !
[ खेऽच्या० ]
आर् पगा माजले खुशाल–शेटी !
मजुरा झाली महाग रोटी !
[ खेऽच्या० ]
हाय् दुनियेमंदी दानत् खोटी !
मर्दांच्या हातांत नरोटी !
[ खेऽच्या० ]
ह्यी हाती आली बिगार–पाटी !
शेहेरामंदिच् बिराड थाटी !
[ खेऽच्या० ]
मंग माय् भयनीच्या कुटच्या र् गाटी !
मर्दांच्या हातांत नरोटी !
[ खेऽच्या० ]

आन् जित्या मड्याचि च् भवती दाटी !

( ध्रु ) रगात वोकुन चडती ताटीं !

[ खेऽच्चा० ]

भाउ, दुनियेमंदि र् दानत खोटी !

मर्दाच्या हातांत नरोटी !

[ खेऽच्चा० ]

—८—

पर, करा करा बेट्यांनों छाती !

इमारती या मर्दा–हातीं !

[ खेऽच्चा० ]

आर आवळली मानवर जोतीं !

पाठीवर लय् भारी पोती !

[ खेऽच्चा० ]

जुन् जिनगानीची झाली माती !

इमारती पर मर्दा–हातीं !

[ खेऽच्चा० ]

पग् काम करून ह्ये लाथा घेती !
कले अमाला ती शिर्मंती !
[ खेऽच्चा० ]
आर ताक पाजुन् लोनी खाती !
धुळवड् चारुन् पैस नेती !
[ खेऽच्चा० ]
तुमि टाका फ्येका र चुन्यांत माती !
इमारती पर आमृच्या हातीं !
[ खेऽच्चा० ]
ह्या जिनगानीचं जोखिम् हातीं !
इमारती बी आमच्या-हातीं !
[ खेऽच्चा० ]
मंग् दगडी भिंती र गानं गाती !
" इमारती मर्दाच्या हाती ! "
[ खेऽच्चा० ]

—९—

स्थळ प्रत
सं. क्र. १०५ न. ११८८
ता. ११२१९०
का. नों.

ह्यो ज्वोर बगा र या दंडांत !
धोंडा चड्ला र् अस्मानांत !
[ खेऽचा० ]
ह्या धोंडा बि व्हता त्या रानांत !
ऐट करी बेटा घाटांत !
[ खेऽचा० ]
तो व्हता राजा त्या रानांत !
तितंच हाय त्याचं गनगोतं !
[ खेऽचा० ]
आर कडे–कपारीच्या किल्ल्यांत
राजा न् रानी ! समूदी जात !
[ खेऽचा० ]
आन् हिरव्या पाचूच्या बंडींत !
चैन करी झुल्झुल् पान्यांत !
[ खेऽचा० ]

त्या झाडामाडांच्या चवऱ्यांत !
चोपदार डोंगरमाथ्यांत !
[ खेऽच्चा० ]
मंग् मनांत बोले लय् लय् हेत !
दैवाची पर् न्यारी मात !
[ खेऽच्चा० ]

—१०—

हा व्हता बेटा लय् ऐटींत !
कपाल पर फिरलं निमूशात !
[ खेऽच्चा० ]
धड्!- धड्ड्ड्!- दारु करते घात !
ऊर फाटला !...लय् आकांत !
[ खेऽच्चा० ]
आर चड पड तो गोते खात !
ठिकऱ्या झाल्या !—न् खडा खडींत !
[ खेऽच्चा० ]

मग् घन् सोस राजाच माथं !

चिनी हतोडा !... माथीं र् लाथ !

[ खेऽच्चा० ]

आन् कपच्या पडती !... जळे मनांत !

दोरखंडाची र् गल्यांत तात !

[ खेऽच्चा० ]

भाउ, गोत बाजुला ! हा गाडींत !

राजा बेटा र झाला चीत !

[ खेऽच्चा० ]

ह्यो ज्वोर बगा पर या दंडांत !

हं धोंडा चालला र् अस्मानांत !

[ खेऽच्चा० ]

—११—

हा गुलाम आला या शेहेरात !

राजा व्हता त्या रानांत !

[ खेऽच्चा० ]

मंग् गुलाम राजा ! निग वरात !
धापा टाकत ये गाडींत !
[ खेऽच्चा० ]
आर लाचाराच्या तण् दातात !
घराघरावर निग वरात !
[ खेऽच्चा० ]
मंग् न्हाइ रानी ! न्हाइ नात-गोतं !
गुलाम राजा गचके खात !
[ खेऽच्चा० ]
तो नवका आला र् ह्या शेहेरात !
पैका मोजी धनी घरात !
[ खेऽच्चा० ]
आन् मेला र मेला या शहरांत !
विटा-चुना-रेतीचं गोत !
[ खेऽच्चा० ]
ह्यो ज्वोर बगा पर् या दंडांत !
राजा र तरगे अस्मानात !
[ खेऽच्चा० ]

स्थळ प्रत
सं. ......... नं. ...
ता. .........
ठाणे.

( भारामुळें अगदीं विलंबित )

पर पगा पगा मर्दाचा हात!
[ खेऽच्चा॰ ]
ह्यी भुई कशी पण क्येली चीत!
[ खेऽच्चा॰ ]
आम्हि पोट जालतो या शेहेरात!
[ खेऽच्चा॰ ]
पर ज्वोर कसा रऽ या दंडांत!
[ खेऽच्चा॰ ]
अर विट–विटन चड्लि परात!
[ खेऽच्चा॰ ]
आन् भुईंत पाया!—मजल सात!
[ खेऽच्चा॰ ]
तो सुकात नांदल धनी घरात!
[ खेऽच्चा॰ ]

आर ऐट कशा पायी घाटांत ?
ग्येल र् आता बा गन–गोत !
[ खेऽऽचा० ]
जा ! वर वर जा तूं गचक खात !
नाय् तर कर्‌शिल् आतां घात !
[ खेऽचा० ]
जा जा राजा र् धक्क खात !
खाली भुइवर मजल सात !
[ खेऽचा० ]
आन् तुजच बा खालीं गन–गोत !
नको करुं र त्येंचा घात !
[ खेऽचा० ]
हं ! आला आला अस्मानांत !
हलुं र् गड्यानों ! कराल घात !
[ खेऽचा० ]
पर् ज्वोर बगा, भाउ, या दंडात !
राजा चढ्‌ला र् गच्‌क खात !
[ खेऽचा० ]

—१५—

आन् बगा बगा पन् अमूची छाती !
इमारती या मर्दा–हाती !
[ खेऽच्चा॰ ]
आर जिनगानीची झाली माती !
इमारती पर मर्दा–हातीं !
[ खेऽच्चा॰ ]
या दगडी भिंतिबि गानं गाती !
‘ इमारती मर्दाच्या हाती !’
[ खेऽच्चा॰ ]
आर घनीपनापुरतिच् शिरमंती !
इमारती पर मर्दा–हाती !
[ खेऽच्चा॰ ]
हो इमारती या मर्दा–हाती !
इमारती मर्दाच्या हातीं !
[ इमारती मर्दाच्या हातीं. ]

मुंबई
१५ डिसेंबर १९३८

# ७

# मानवर हाय् लय् बोजा !

१ आसुड पाठीवर चुचकारी !

२ डफ् डुमडुमल' र माजा !

# मानवर हायू लयू बोजा !

[ राग—मिश्रकाफी
ताल—विलंबित केरवा ]

[ **भूमिका**—घाटावरच्या कांहीं गाड्यांचा तांडा, तळ सोडून, सकाळीं भल्या पहांटेस पुढल्या पल्ल्याकडे चालला आहे. पहिला गाडीवान् घुंगुर व चाकें यांच्या ‘ खुळ्खुळ्–खड्खड् ’ आवाजावर ‘ राजा राजाऽ!–सर्जा सर्जा ऽ ! ’ म्हणतां म्हणतां, शेवटीं गाणें म्हणूं लागतो. मधून मधून घोगऱ्या आवांजात मागले गाडीवान त्याला ‘ चाल् राजाऽ ! चाल् सर्जाऽ ’ असें म्हणून सांथ देत आहेत. ]

## [ पूर्वार्ध ]

चाल् राजा र ! चाल् सर्जा !
बिगि बिगि चाल् र राजांनों !
चाल् राजा ऽऽ! चाल् सर्जा !
चाल् राजा ऽ ! चाल् सर्जा ऽऽ !

मानेवर हाय् लय् बोजा र !
चाल् राजा ऽऽ! चाल् सर्जा ऽऽ! १

मैतर आपुन् मोप दिसाच !
चाल् राजा ! चाल् सर्जा !
मानवर हाय् लय् बोजा !
पन् बिगी चाला ! राजा सर्जा !
वाऱ्यावानी मोटर चाल !
बिगि राजा ! बिगि सर्जा !
पर भूत नको त्ये ! तुमीच माजा !
चाल् राजा !–चाल् सर्जा ! २

आर कडब्यावर राती सरल्या !
आन् माना तुमि र भागइल्या !
मंग् निंगुत तर या जुपि झाल्या !
हां, पाउल् उच्‌ला र त्येकांनों !
चाल् राजा ऽ ! चाल सर्जा !– ३

ह्ये वार बगा र गार फिर !
आन् तांबुडं आभालांत ठर !
हाय् उग्वतं बाजू ह्यी म्होर !
आर फट्फट्ल ह्ये फाट येलचं !
चाल राजाऽ ! चाल् सर्जा ऽ! ४

काय् भ्या भरल व्हय् कार उरीं?
न्हाय् वाघोबाची र स्वारी !
पग् आता ग्येलाऽ माघारी !
तो रान धुंडतोर् पान्यासाटीं !
बिचकु नका ! राजा सर्जा ऽ ! ५

आर शेंदुर नारुल् वाघ्याला !
आन् बलि बि दिला भ्यां त्ये येला !
हाय् वाघाया र द्येव भला !
त्यो जाइल् न्हाइ वाट भलत्याच्या !
बिगि चाला ! राजा-सर्जा !.. ६

ह्ये दाट धुकं !.. हाय् वाट चडी !
त्यो घाट फुड ! दगड–दरडी !
मंग् ध्यान धरा र च्यार घडी !
ह्ये जूं मानच लय् भारी !
पन् पल्याड धीर न्या कब्जा ! ७

चाल् !–रेंगालुन् चालल कसं ?
त्यो डोयीवर तापल दिस !
लय् उर् धापल् !.. तोंडा फ्येस !
आर थंड येल हाय् तवर चाला !
बिगि राजा ! हां बिगि सर्जा ! ८

कोन् ध्येतिल बसकन् चडावर !
..आन् उतरंडीला लय् म्होर !
त्ये मुलकाच खोड्याल खर !
पर आसुड त्येंच्या पाठीवरती !
बिगि चाला राजा सर्जा ! ९

स्थळ प्रत
ठाणे.

पर राजांनों, तुमि त्यातल् न्हव !
..आन् समद्यानी बी गुन गाव !
'लय् डौलदार जोडी'.. नांव !
मग हातीं आलर् जोखिम् तुमच्या !
चाल् राजा र !.. चाल् सर्जा! १०

आन् गतसाल्च र ध्यान धरा !
त्यो दगड्या कड्यांत दोनपरा..
हाय् लटकून म्येला माघारा !
हां, ह्यीच खिंड!.. आन् ह्येच दीस त्ये !
पल्याड धीर न्या कब्जा ! ११

ती परान कोकनची जाच !
आन् खेड्याच मन् धोंड्याच !
लय् रगात काडी जोडीच !
पर् आसुड पाठीवर चुचकारी !
जीव येक तुमचा माजा !.. १२

## [ उत्तरार्ध ]

( आपलें आयुष्य आठवीत )

म्या घाम ढालला र गात !
आन् मोती प्येर्‌लं श्येतात !
मंग् काळी भिजली पान्यात !
आर् डोइ काडती रोपे वर्‌ती !
मळा दाटलार माजा ! १३

भाऊ, भुई धर वर्‌ती रोप !
आन् आस धर मंग् मन् मोप !
पर् लय् तल्‌मल् !.. नाय् ये झोप !
अर श्येतकऱ्याचा जीव मळ्याशी !..
पोट पिकावर् र राजा ! १४

मंग् मोती पिकल भरघोस !
पग् वाऱ्यावर डुलती कनस !
त्या सौद्यावर चाल वर्स !

ह्यी मुल मानस पदरि र् राजा !
डोईवर अपल्या बोजा ! १५

जर भरारती पाखर वर !
तर भरल्या श्येति बि पोर मर !
मन् सैतानावानीच फिर !
मंग् 'हाः ! हाः !' करतो !.. श्येत राखतो !
गोफन् भिरभिरलि र् राजा १६

कुल्द्येवाला नैवेद दिला !
आन् गोंवऱ्यांत हुर्डा भुजला !
आर् पगा पगा !· जुन्धळा पिकला !
त्ये गळ्ल मोती !.. झालबि मोती !!
—द्येव पावला र माजा ! १७

आर श्येत पिक !.. घाला घाला !
मंग् चला चला र फाटला !
मउ हुर्डा खायाला श्येताला !

अर् चला च्यार खिन् मौज लुट्ट र!
चाल् राजा!.. चाल् सर्जा! १८

पन् नव्तीचा हुर्डा सरला!
मंग् चला अतां र फाटला!
करुं घात येलच्या काप्नीला!
हं आज ह्यो मळा!.. उद्यां पल्याड्ला!–
चाल् राजा ऽ! चाल् सर्जा! १९

मंग् आडव झाल र जुन्धळ!
आन् उजून त्यो काळा माळ!
पग् ढवळाबि झाला मळा–खळ!
ह्ये ढवळ डोंगर चडल वरती!
कनग भरल र राजा! २०

मंग् मजेमदी चांद्या राती!
गडि वाडुळ दम् आता घ्येती!

सं. ........ नं. ........
ता. ..........
ठा पे.

आन् सुगीवर गान गाती !
आर् कलिंग–तुऱ्याच्या फैरी झडती !
डफ् डुम्‌डुम्‌ला र माजा ! २१

त्यो लावनी गाई गानारा !
पर् 'पिकला गहु हरभरा' खरा !
आन् हुळा चालला घराघरा !
ह्यी श्येतकऱ्यान दौलत क्येली !!
चाल् राजा ! चाल् सर्जा ! २२

पर् माज दो दिसाचा ठरला !
कर–सारा सरकारीं भरला !
काय् कडबा क्येला तुम्हाला !
आन् मुला मानसा थोड दाऽन !
वर्स सर ! राजा सर्जा ! २३

भाउ, जीव एक तुमचा माजा !
ह्ये पोट हाति ! मंग् का माजा ?

आन् शिरावर हाय् लय् बोजा !
पर घाम डोइचा ढाळुन बी मी माज्या मनचा
हाय् राजा ! २४

चाल् राजा ! चाल् सर्जा !
हाः बिगि राजा !–बिगि सर्जा !..

मुंबई
९ जानेवारी १९३९

# ८

# दर्याचें गाणें

१ दर्याला आलय् लई तुफान् !

२ हं दर्याचे वीर आम्ही ! दर्या मकान !

३ घरा मानकु माजि गोरी गोरी पान !

४ बाबू मानकुचा न् माझा परान् !

# दर्याचें गाणें

[ राग—मिश्र बिलावल.
ताल—केरवा ]

[ **भूमिका**—एक मासेमारीला निघालेली टोळी एका मोठ्या होडींत बसून शीड उभारून चालली आहे. मधून मधून जरूर तेथें वल्ही चालवीत ते जात आहेत. सारखी वल्ही मारतांना म्होरक्या गुणगुणूं लागतो. ते स्वर धुमूं लागून साऱ्यांचें लक्ष तिकडे वेधून त्याला गाण्याचें स्वरूप येतें. म्होरक्या गाणें म्हणूं लागतो; त्याला इतर साथ देतात—‘ ही व्हडि जाव् दे सरारररा ’ मग प्रत्येक ओळीनंतर ते त्याला साथ करतात. ]

—१—

**[ लांबून होडी येत आहेः नुसते वल्ह्यांचे व समुद्राच्या लाटांचे आवाज. ]**

[ आवाज मोठा होतो; जवळ येतो; कुजबुज. ]

[ **म्होरक्याः**—हुंकारात्मक ]

**व्हडिवाल्या, व्हडिवाल्या ! व्हलकाऱ्या !**

ह्यी व्हडि जाव् द्ये सरारारा !

[ सारे हुंकारात्मक ]

ह्यी व्हेडि जाव् द्ये सरारारा !

[ म्होरक्या:—जवळ येत स्पष्ट ]

व्हडिवाल्या, व्हडिवाल्या ! व्हलकऱ्या !

माज्या व्हलकऱ्या !

ह्यी व्हडि जाव् दे सरारारा !

[ ह्यी व्हाडि जाव् दे सरारारा ! ]

दर्याला आलय् लई तुफान् ! बोलते लई तुफान् !

[ लई तुफान् ! बोल्ते लई तुफान् ! ]

गरगर लाटा ! चड उदान् !.. लय् चड उदान् !

[ लय् चड उदान् ! .. ह्ये चड उदान् ! ]

रुप्याचि मासूली करी उडान् ! मास्लि करी उडान् !

[ मास्लि करी उडान् ! ह्यी करी उडान् ! ]

जाल्यात् गावला ह्यो म्हावरा नादान्!ह्यो म्हावरा नादान्!

[गावला म्हावरा नादान् !.. ह्यो म्हावरा नादान् !]

त्याच्यावानी माज मन ब्येभान् ! माज मन ब्येभान् !

[ माज मन ब्येभान् ! झालं मन ब्येभान् ! ]

रापन् आडू भरा भरा !

[ ह्यी व्हडि जाव् द्ये सरारा ! ]

रापन् ओढू भराभरा !

[ ह्यी व्हडी जाव् द्ये सरारा ! ]

व्हडिवाल्या, व्हडिवाल्या ! व्हलकऱ्या !

माज्या व्हलकऱ्या !

ह्यी व्हडि जाव् द्ये सरारा !

[ ह्यी व्हडी जाव् द्ये सरारा ]

[ दर्यांत तुफान होतें; . . आणि क्षणभर गाणें विरतें. ]

—२—

[ तुफान कमी होतें; गाणें पुन्हा सुरू. ]

हं ! संबाल् संबाल् शिड् !.. धर सुकान् !
विगि धर सुकान् !
[ बिगि धर सुकान् ! तूं धर सुकान् ! ]
दर्यांचे वीर आमि !.. दर्या मकान् !
आमचा दर्या मकान् !
[ आमचा दर्या मकान् ! ह्यो दर्या मकान् ! ]
मासूली घेत्ये आमा दर्यांचि खान !
बगा दर्यांचि खान् !
[ ह्यी दर्यांचि खान् ! बगा दर्यांचि खान् ! ]
तगव होडी ! धीरानं हान् ! तूं धीरान् हान् !
[ होडि धीरान् हान् !.. तूं धीरान् हान् ! ]
हं संबाल् ! झाला हाय् दर्या तुफान् !
बग दर्या तुफान् !
[ धीरान् हान् ! हाय् दर्या तुफान् ! ]

सं. ....... नं.
ता. .......
ठाणे.

व्हली चालू द्या भराभरा !

[ हं, ह्यी व्हडि जाव द्ये सराररा ! ]

व्हलि चालू द्या भराभरा !

[ हं, ह्यी व्हडि जाव द्ये सराररा ]

व्हडिवाल्या, व्हडिवाल्या ! व्हलकऱ्या !

माज्या व्हलकऱ्या !

ह्यी व्हडि जाव् द्ये सराररा !

[ ह्यी व्हडि जाव् द्ये सराररा ! ]

—३—

[ थोडा वेळ संथ चालल्यावर ]

दर्याचा नाच् ! आन् जीवाचा रान् !

ह्ये जीवाचा रान् !

[ ह्ये जिवाचा रान् ! बगा जिवाचा रान् ]

पर घरा मानकु माजि गोरि गोरि पान् !

हाय गोरि गोरि पान् !

[बाय् गोरि गोरि पान् ! हाय् गोरि गोरि पान्]
कवळी काकडी!.. नाजूक चान्!
जनु नाजूक चान्!
[ जशि नाजूक चान्! हाय् नाजूक चान्! ]
तिची न् माजी जोडि लय् छान्!
हाय् जोडि लय् छान्!
[ हाय् जोडि लय् छान्! ह्यी जोडि लय् छान्! ]
तिच्यासाटी माजा जीव ब्येभान्!
झाला जीव ब्यभान्!
[ झाला जीव ब्यभान्! हाय् जीव ब्यभान्! ]
तिला भेटू द्ये भराभरा!
[ ह्यी व्हडि जाव् द्ये सरारंरा! ]
चाफ्याचां फुल् तिला द्येइन घरां!
[ ह्यी व्हडि जाव् घे सरारंरा! ]
डोक्यांत् फुल् मानकु लाजल् जरा!

[ ह्यी व्हडि जाव् द्ये सराररा ! ]
व्हडिवाल्या व्हडिवाल्या ! व्हलकऱ्या !
माज्या व्हलकऱ्या !
ह्यी व्हडि जाव् द्ये सराररा !
[ ह्यी व्हडि जाव् द्ये सराररा ! ]

—४—

बाबु मान्कुचा न माजा परान् ! तो माजा परान् !
[ बाबु माजा परान् ! हाय् माजा परान् ! ]
'शिर्ग' लिवतो हाय् शालेत छान् !
लिवतो शालेत छान् !
[ बाबु शालेत छान् ! लिव्तो शालेत छान् ! ]
शरट पेरतो आन् निली तुमान् !
पेरतो निली तुमान् !
[ बाबु निली तुमान् पेरतो !.. निली तुमान् ! ]
तूं संबाल् लंगोटा ! न् मार सुकान् !
आर् मार सुकान् !

[ चल् मार सुकान्! नाखूरा मार सुकान्! ]
आपन् मारतो मासलि! दर्या–उदान्!
ह्ये दर्या–उदान्!
[ चड दर्या उदान्! ह्ये दर्या उदान्! ]
खाऊ मागल् बाबु!– चला घरा!
[ ह्यी व्हडि जाव् द्ये सरारा! ]
[ लांब जात जात— ]
व्हडिवाल्या व्हडिवाल्या! व्हलकन्या!
माज्या व्हलकन्या!
ह्यी व्हडि जाव् द्ये सरारा!
ह्यी व्हडि जाव् द्ये सरारा!
ह्यी व्हडि जाव् द्ये सरासरा!

मुंबई,
२० आगष्ट १९३८

९

# लाटामद्दी डोल डोलकाटी !

# लाटांमदी डोल डोलकाटी!

[ राग—कॉफी मिश्र
ताल—केरवा. ]

**स्थळ**—समुद्र किनाऱ्यावरील म्हाद्या कोळ्याचें खोपट.

**पात्रें**—म्हाद्या व गोमू. **वेळ**—संध्याकाळ.

[ **प्रसंग**—म्हातारा म्हाद्या कोळी वापरून वापरून तुटलेल्या जाळ्याच्या गाठी पुन्हां विणून नीट करीत आहे. त्याची तरुण मुलगी गोमू आंत खोपटांत चुलीजवळ कांहीं करत आहे. म्हावऱ्याची टोपली घेऊन मासळी बाजाराकडे जाण्याची तिची वेळ झाली आहे. म्हाद्याहि थोड्याच वेळांत मासेमारीसाठीं पुन्हां दर्याकडे जाणार आहे. ]

**गोमू**—( आंतून ) बाबाऽ! जाल्याच्या गाटी झाल्या र तुझ्याऽ? मी जात्ये बाऽजाराऽ मासली झेन् !

**म्हाद्या**—( ओटीवरून जाळे विणतां विणतां आंत पाहून ) गोमू इकडं ये !—मीव् जातो दर्याला !— पोरंऽ! वक्त झाला !—

[ गोमू ओटीवर डोकावते ]

म्हाद्या—( जाळें विणत )

जकल्या जाल्याच्या झाल्या गो गाटी ऽ !–
माजि लाटामदी डोलकाटी !
आतां जाल्याच्या झाल्या गो गाटी ऽ !
माजि लाटामदी डोल डोलकाटी !–

दिस बुडल् !-बग् वोकत जाला !
उदान् चडल् !..चांद आभाला आला !
म्हावरा बिजा तो घेइल आमाला !
व्हड्या पान्यामदि गो जाती !
आमूची लाटामदी डोल डोलकाटी ! १

सरग-पापलेटां जकलां ह्यां ताजा !
मासलि झेन तूं बाजाराला जा !
सौदा कराया दर्यासि बीजा !–
डोल लाटामदि माजी व्हडी !
पोरि, डोलं लाटामदि डोलकाटी ! २

[ निःश्वास टाकून ]

दिसादिसान वाढशि पोरी !
तरनपनाची आली तरारी !
[ आन् काय सांगूं, पोरे ? ]
आया तुजी व्हति सुरख गोरी !
तिच्या रुपाचि तूं क्येलीस चोरि !
पोरि, लाटामदी माजि डोलकाटी ! ३

हौस असल् तुला तरनेपणाची !
चोली प्येर पन् साद्या खनाची !
पदर सरखा झे !.. लाज कुलाची !
आन् नखर नको नव नकली गो !
पोरे, वाटन जाव् नको येकली ! ४

नारोवर माज्या गोमूचां ध्यान !
[ माल् म्हायताय् , पोरे ! ]
पोरी, तुला तो ब्येस जवान !

[ लाजल्ये कला गो ऽऽ ? ]

लाजू नको ! . . करु औंदा लगीन !
पन् संबाल् गोमू, तुज तरूनपन् !
जनु डोले लाटामदि डोलकाटी ! ५

गोमूऽ !—

तुज्या हातीं माज्या कुलाचा तारूं !
दर्या तुफान् ! . . शिड् नको उभारूं !
आन् नारो नाकवा कदि घ्येतो गो दारू !
न् दारूचि मजा मला म्हायताय गो !
त्या वाटन जाव् नको येकली ! ६

तुज्या डोईवर म्हावरा टोपली !
बाय्, त्या वाटन जाव् नको येकली !
त्या वाटन जाव नको येकली !
गोमु, तुज्या डोइवर म्हावरा टोपली !
त्या वाटंन जाव नको येकली !

[ जाळें गोळा करून उठतो व टोपली वगैरे घेऊन जाऊं लागतो. ]

म्हाद्या–बरा! जातो गो गोमु,दर्याला! आता फाटला येन्!

गोमू– ( आंत वळून ) हां बाबा ! मीव् जात्ये बाजारा मासली झेन् !

[ म्हाद्या समुद्राकडे जातां जातां आपल्याशी गुणगुणतो.– ]

डोलकाटी ऽ ! लाटामदि माजि डोलकाटी !–
गोमू घरा ऽ माजि डोलकाटी !
डोलकाटी !.. डोलकाटी !.. डोलकाटी!!

मुंबईः
१८ सप्टेंबर १९३८

# १०

# चल् चल् घरट्याशीं!-

१ मी तव दासी !
२ दूर दूर तव मिरास !
३ तो स्वैर वात—
४ माड दाटती !
५ सळसळतो पाचोळा ! त्या रुखावळी।
६ वेताळ प्रेमळ !..नाद खुळ्खुळ् !
७ तेथ तुझें दीन सान सदन नांदतें !
८ दूर दूर तव मिरास ! कोंकण-भूवासी।

# चल् चल् घरट्याशीं

## [ जलतरंगिणीचें गाणें ]

राग—मिश्र खंबावती.
ताल—एकताल.

—१—

" चल्चल् घरट्याशी ! नंदन—वन—वासी
हें कोंकण—वन ! नंदन—वन ! तूं नंदन—वन वासी !
चल्चल् घरट्याशी ! हे कोकण—भू—वासी !
मी जलदेवी साची ! कोंकण—भू—वासी !
मी नील जलावर तरतें फेंसळत वीची
मी जलदवी साची ! मी तव दासी !

—२—

" हे कोकण—भू—वासी !
कोकणभूवासी ! नंदन—वन—वासी !
ती दूर दूर तव मिरास !... दूर तटाशी !
चल् घरट्याशी ! चल् घरट्याशी !



दा. क. ५००

'राहिल घर दूर जरा !'..धीर मनाशी !
जरि पोट तुला भटकत ने ! थांब तटाशी !
त्या दूर तटाशी
अन् चल घरट्याशी ! मी तव दासी !

—३—

"तो स्वैर वात फिरत शिरे लहरि मिजाशी !
लहरिलहरिवरुनि धरी ताल तटाशी !
डोले जल–राशी ! डोले जल–राशी !
अन् गुंगुं गुणगुणत तिथें थेट तटाशीं !
भान हरे !.. गान करी तव घरट्याशी !...
छोट्या घरट्याशी ! छोट्या घरट्याशी !
हे कोकण–भू–वासी ! चल घरट्याशी !
हीच हीच तव मिरास ! चल् घरट्याशी !

—४—

"गर गर फिरतात मीन ! फेन उसळती !
सळसळती नीळ–जळीं खेळति पळती !
त्या चंचल ज्योती ! त्या चंचल ज्योती !

डुबक् डुबक् डुलत प्रभा चंद्र–तारकांचीं !
त्या नील जलावर तरती कौमुदि–मय वीची !
स्फूर्तीच कवीची ! स्फूर्तीच कवीची !
पट पट तटिं फुटत लाट ! माड दाटती !
थाट करिति उंचावुनि शिर ते बघ वदती !
प्रेमे गद्गगती ! प्रेमे गद्गदती !
‘ आम्हि कोंकण–भू–वासी ! आम्हि नंदन–वनवासी !
हीच हीच तव मिरास ! चल् घरस्याशी !
कोंकण–भू–वासी ! चल् घरस्याशी !’

—५—

“ सळसळतो पाचोळा डोंगरा तळीं !
ताम्रवर्ण वृक्षशिरीं ! पसरल्या घळीं !
त्या तांबड्या घळी ! त्या तांबड्या घळी !
नील–नभीं झोलावत माड झावळी !
रुचकर करती कोकम–बोर–पोफळी !
फलभार पोवळी ! फलभार पोवळी !
आम्र–तरु–मंजरिचा गंध राउळी !

तो पारिजात शोभवीत बकुळ सावळी !

सुकुमार कोवळीं ! सुकुमार कोवळी !

पिंपळ–वड जीर्ण जरी करित सावळी !

परिचित तव भवति अजुनि त्या रुखावळी !

करतात सावळी! त्या रुखावळी !

चल् चल् घरट्याशी ! कोंकण–भू–वासी !

हीच हीच तव मिरास ! चल् घरट्याशी !

—६—

" खडकाळया माळ रानिं नाग धावती !

त्यांस परी शापित जणुं तेथ तरु–तती!

त्या उंच तरुतती! त्यांस शापिती!

किर्र किर्र रान करी!..पेटला चुडा!

चालले वऱ्हाड पुढे!..झडत चौघडा!

तो भयद चौघडा!..अन् सूरही चढा!

आवस–पौर्णिम चाले हाच गोंधळ!

भय मनांत!–तोंच उठे नाद खुळ् खुळ्!

तो नाद खुळ्खुळ्!..वेताळ प्रेमळ!

करकर वेताळ फिरे !– पाळतो तुला !
सळसळ रानांत भरे चारि बाजुला !–
चारि बाजुला !– पाळतो तुला !
‘ देव महाराज ’ रक्षि! छळत ना शनी !
जागृत तव कुलदैवत विघ्ननाशनीं !
तव विघ्न-नाशनी ! भय कशा मनीं ?
भूवर सरती तारे !.. धरति तरु शिरीं !
चंचल खद्योत–ज्योति फिरति जोंवरी !
खद्योत तरुशिरीं !..त्या स्वर्गिच्या परी !–
सर सर येतात सरी मग पिकांवरी !
सोन्याचे भात उभे !.. भय कशा उरीं ?
चल् घरट्याशी !–भय कशा उरीं ?

—७—

“ तेथ तुझें दीन सान सदन नांदतें !
माता–बाईल तिथें !.. बाळ रांगतें !
आनंद–कंद तें ! आमोद कोंदतें !

दुडदुडती बाळ तिथें खिदळति हसती !
ते बघ बघ बाल–गालिं बोंडु रंगती !
खेळांत दंगती ! आनंद कोंदती !
गृहिणि–उरीं फणस–गरे हे रसरसती !..
मातेचे मिचमिचते नेत्र दाटती !
ये पूर दो तटीं ! ते नत्र दाटती !
जरि पोट तुला भटकत ने !.. थांब तटाशी !
ती दूर दूर तव मिरास ! चल् घरट्याशी !
चल् चल् घरट्याशी !.. त्या दूर तटाशी !
हे कोंकण–भू–वासी ! हे नंदन-वन-वासी !
मी नील जलांवर फिरतें ! फेसाळत वीची !
तूं चल् घरट्याशी !.. चल् घरट्याशी !
ती दूर दूर तव मिरास ! चल् घरट्याशी !
मी जलदेवी साची !– पण तव दासी !
चल् चल् घरट्याशी ! .. चल् चल् घरट्याशी !"

मुंबई,
ऑक्टोबर १९३८.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणे.

# ११

# गुंजारव

## गुंजारव !

[ शहरी खडखडाटांत गुंजारव नाहीं. पण क्वचित् प्रसंगीं, तेथील खुराडांतून बाहेर दूरवर जाऊन, एखाद्या प्रशांत प्रातःकाळीं, खेडवळ निसर्ग–सौंदर्य नवख्या नजरेनें पहात असतांना मात्र, असल्या नेहमींच्याच 'कवि'— कल्पना मनांत हळूच डोकावून गुणगुणून जातात;.. पण त्यांनींहि मन आनंदतें. ]

[ राग–भैरव
ताल–त्रिताल ]

चाले गुंजारव !.. मधुर हा चाले गुंजारव !
अंतरीं रंग नवनव उमटवी !–चाले गुंजारव !
गुणगुणत भ्रमर धावती !
हृद्–वीची हेलावती !
आनंद–उर्मि उसळती !
ही अननुभूत टवटव, मानसीं !– चाले गुंजारव !
१

लपली नभिं तारावली !
ती इंदुकला परतली !

कमलिनि रविला लाजली !
सारखी हसूं लागली तयाशी !–चाले गुंजारव ! २

या प्रातःसमयीं अशा,
रविराज न् प्राची दिशा
उधळती नवोनव यशा !
करतात प्रेम–पखरण परस्पर !–चाले गुंजारव ! ३

नभिं धावे वेगें घन;
पसरला, दाटला घन;
उधळतो आपुलें धन !
पांढरा फडफडे झगा रवीचा !.. चाले गुंजारव ! ४

उमलुनी कळ्या पाहती
वायुवीचि डोलावती !
गुद्गुल्या न त्या साहती;
त्यामुळें हास्य कोमल तयांचें !.. चाले गुंजारव ! ५

ही निसर्ग–देवी उठे !
नटुनि ही निघाली कुठें ?
बहुरंगी शालू वठे !
मधुमधुर गुणगुणे रव स्वत:शी !..चाले गुंजारव !–

६

डोकावी सविता वर;
भोंवतालच्या तरुवर,
फिरवितो हजारो कर !
जनकाच्या प्रेमें स्वर तरूंचा ! .चाले गुंजारव !

७

जग धरी नवी टवटवी !
कीं, कोमल तरु–पालवी !
चकचके !.. शिरें हालवी !
सवित्याचें स्वागत करी सारखी !..चाले गुंजारव !

८

प्रियसख्या सवें घेउनी,
नीरोप नगा देउनी,..

सरिता मनि आनंदुनी
पति समीप धावें मुदें गात ती!.. चाले गुंजारव!

९

नग ऋषी जणूं बैसला,
सुस्नात सुचर्चित भला;
संध्येला अर्पी जला!
गायत्री मंत्र गंभीर निनादे!– चाले गुंजारव!

१०

गणगुणत भ्रमर धावती!
हृद्वीची हेलावती!
आनंद–ऊर्मि उसळती!
ही अननुभूत टवटव!.. मानसीं चाले गुंजारव!

११

अंतरीं रंग नव नव उमटवी!.. चाले गुंजारव!

पालघर,
१६–११–२९

‘आजच्या गाण्यां’तील

‘हुश्शार’ ‘डोलकाठी’

‘ह्यी व्हडी...’ व

‘चल् घरध्याशी’

या गाण्यांतील कांहीं संपादित भाग

—ध्वनि-मुद्रित केला आहे.—

# १२

# करांत कोलित !--
# माकड मानव !

# करांत कोलीत ! माकड मानव !

[गरुड-भरारी वाटते साधी, पण असते फार कठीण! ]

राग--दुर्गा.
ताल—त्रिताल.

झणीं ऊठ मना !– घे गरुड भरारी !
नर राख पसरवी जगावरी!.. ऊठ मना !

तळमळ सारी शर जिव्हारीं !
मानवता स्वार्थास हावरी !
जग झांकळतीं ढगें धावरीं !
तूं कर जा स्वर्गावर स्वारी!.. ऊठ मना !
१

जाइन वरवर ! वळुनी पाहिन !
निळें मोकळें मज तारांगण !
' सहन न माझ्या मळ्यास कुंपण ! '
कर उंच भराऱ्यांची स्वारी!.. ऊठ मना !
२

जाइन वरवर !.. पाहिन भू-वर !
क्षूद्र दिसे जग नभांत जोंवर !
..परि मज तेंहि गणें क्षूद्रतर !
तरि खंत नको !.. मम स्वर्ग उरीं !.. ऊठ मना !

३

हीन करा नर ! जा जा झुंजा !
खूशाल जगतीं स्वार्थें माजा !
मी तर आतां माझा राजा !
मी सज्ज जावया स्वर्दारीं !.. ऊठ मना !

४

काय करी तम तेजःपुंजा ?..
सूर्य सोबती झाला माझा !
परि जग जगवा !.. कांहीं योजा !
ती पहा काजळी तुम्हावरी !.. ऊठ मना !

५

सरसर जग ये सारें वरतीं !
धापा टाकित यंत्रें फिरतीं !



स्थळ प्रत
सं. 41104 न. 912
. 172190
ता. मों.

शहरी मजले हवेंत तरती !
हा धूर परी पसरला भू–वरी !.. ऊठ मना !

६

शास्त्रावर जगताची किंमत !
शास्त्रच आणी जगांत हिंमत !
शास्त्र चालवी भूवर हुकमत !
जग पुढें सरें शास्त्रेंच जरी ?.. ऊठ मना !

७

वीस शतांनीं जगतीं जेता !
'धर्म' ! 'न्याय' !.. विश्वाच्या बाता !
सुधारला नर !–वानर होता !!
मग कसाब करणी तोच करी !.. ऊठ मना !

८

निसर्ग निर्मी सुगी, जगाला !
..परि ओझ्यानें मेला हेला !

पिवळ्या शेतीं खेडुत मेला !!
‘ नरवीर ’ जगाचें रान करी !.. ऊठ मना !
९

पोटासाठीं सारी भगभग !
यंत्र–युगाचा मंत्र एक मग !
मानव करितो मुंग्यांचें जग !!–
जगिं मर्दीं जगवितो कशीं तरी !.. ऊठ मना !
१०

शास्त्र जोडते जगांत मानव !
शास्त्र करी परि देवा दानव !
शास्त्रें मेला भूवर मानव !
ही राख उरे बघ जगावरी !.. ऊठ मना !
११

करांत कोलित !.. माकड मानव !
संहाराचे शोध करी नव !
पशू लाजले पाहुन तांडव !

जा पुन्हां नराला ओढ वरी !.. ऊठ मना ! १२

दाट कोंदले भीषण वारे !
सुगम जीवनीं युद्ध फवारे !
वर्षामागुन वर्ष भरारे !
ही स्मशान रोखें जीवन–वारी !.. ऊठ मना ! १३

सावध भाई ! मानव सारे !
सृष्टि–माइचीं अम्ही लेकरें !
सुखी बनूंया स्वैर पाखरें !
चल् स्वर्ग उभा कर भूमि–वरी !
घे घेच नरा ! ही गरुड भरारी !! १४

मुंबई,
नववर्षप्रभात १९३९

# तरंग

राग—पूर्वी.
ताल—त्रिताल.

काळा भूत करून त्यास धरण्या मी हो न वेडापिसा !
पूर्वीचें यशदुःख ना डंवचतें माझ्या कधीं मानसा !
' होवोनी यशवंत काय मिरवूं आम्ही यशोमंदिल !
किंवा भालिं असे अपेश ?—जगणें होवोनिया बेदिल ?

विश्वाच्या कुरणांत क्षुद्र कण मी ! नाहीं मला योग्यता !
माझ्या जीवन-संगरास कसली आहे जगीं मान्यता ?
माझा जीवन-हेतु काय ?—भंवतीं सृष्टी कशा झांपडे ?
कां मी या जगतीं फिरे—धडपडे ?..जाणार कोठें पुढें ?'

आम्हाला नच वेळ येथ करण्या ही फोल प्रश्नावळी !
आहे जीवित सान !—थोर करणें कार्यें महीच्या तळीं !
होऊं सावध !— वर्तमान धरण्या हा घट्ट इच्छाबलें !
आतां हें भवितव्य सर्व अमुच्या हातांतलें बाहुलें !

ॐ ॐ ॐ

नेटानें करण्या प्रयत्न, स्वमनीं विश्वास आम्ही धरूं !
आम्हां योग्य गमेल तेंच करण्या आम्ही कधीं ना डरूं !

पुणें,
१।१।१९३१

१४

# माझी टांकसाळ

# माझी टांकसाळ !

[ आजच्या खोट्या टांकसांळींच्या काळांतील गाणें ]

राग—पिलू
ताल—विलंवित केरवा

माझी टांकसाळ !.. चाले टांकसाळ ! माझी टांकसाळ !
खळखळ नाणीं पाडी, टांकसाळ ! माझी टांकसाळ !
रुपयांची नाणीं पाडी, टांकसाळ ! माझी टांकसाळ ! ध्रु०

केला यत्न आटोकाट !
साम्य झालें आतां दाट !

माप, छाप, .. एक घाट !
परी ठेवी माझी छाप टांकसाळ !
चाले टांकसाळ !.. माझी टांकसाळ !

१

ऊर धपापतो सारा !
कशा पाहिजे पसारा !
कीरा मयूर–पिसारा,
देई पाठीवर भार, टांकसाळ !
माझी टांकसाळ !.. चाले टांकसाळ !

२

संशयास जागा झाली !
चिन्हें व्यक्तित्वाचीं आलीं !
माझी यातायात मेली !
ओरडाल, ‘ बघा खोटी टांकसाळ !
चाले टांकसाळ !’ माझी टांकसाळ !

३

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणें.

अधिकार नाहीं हातीं !
धनीकांचीही ना नातीं !
होती कोत्या यातायाती !
जग गणेल.. 'ही खोटी टांकसाळ !'
माझी टांकसाळ ! चाले टांकसाळ !

४

—आस परी एक मना !
खोटें परीचीत जनां !
पुढें करी खोट्या धना !
तेथें एक खोटी माझी टांकसाळ !
चाले टांकसाळ ! माझी टांकसाळ !

५

—आणि एक समाधान !
माझें रुपयांचें धन !
चूक कराल बेभान !

म्हणाल.. 'ही शीवराई–टांकसाळ !'
माझी टांकसाळ ! चाले टांकसाळ !

६

रुपयांचीं नाणीं पाडी, टांकसाळ ! माझी टांकसाळ !
खळखळ नाणीं पाडीं, टांकसाळ ! माझी टांकसाळ !
चाले टांकसाळ ! माझी टांकसाळ !

मुंबई.
१२ जानेवारी १९३९

---

# विश्रांति

" गडबड घाई जगांत चाले !
— आळस डुलक्या देतो ! पण
गंभीरपणें घड्याळ बोले !
— आला क्षण ! गेला क्षण ! "
त्या प्रत्येक क्षणाचा योग्य उपयोग करावयास
**श्री समर्थ वॉच कंपनी**
[ सरकारी तबेला: मुंबई ४ ]
चीं समर्थ घड्याळें तुम्हाला जागरुक ठेवतील.

साध्या चिठीपासून तों ग्रंथापर्यंत तसेंच
लिथो प्रेसचें काम माफक दरांत सुबक करून देणारा
**श्री सिद्धेश्वर छापखाना**
कोल्हापूर.

" औषधें " स्वस्त व वक्तशीरपणें कोठेंहि पुरविणारी
माधव एजन्सी, मुंबई ४.

REFBK-0005907
REFBK-0005907


# सृष्टींतील सारें सौंदर्य

पहातांना

## R. N. Shinde & Sons

(Girgaon, Parel, Dadar)
BOMBAY.

यांच्या दक्ष मदतीनें

# दृष्टि पूर्ण साफ

ठेवा.


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५६०८